# NOTIFICATION

## सूचना

म्हाडा सरळसेवा भरती -२०२१ अंतर्गत तांत्रिक व अतांत्रिक १४ संवर्गाकरीता ऑनलाईन परीक्षा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या सर्व संवर्गाकरीता कागदपत्र पडताळणी करीता उमेदवारांची सूची म्हाडा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यापैकी कार्यकारी अभियंता, उप अभियंता, सहायक अभियंता व कनिष्ठ अभियंता या संवर्गाच्या कागदपत्र पडताळणी सूचीमध्ये अंतर्भाव असलेले उमेदवार हे अर्ज केलेल्या पदाकरीता जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व निकषांची पूर्तता करीत आहेत किंवा नाही? याची पडताळणी करण्याकरीता त्या उमेदवारांकडून शैक्षणिक/अनुभवाची/जात/जाती प्रमाणपत्र/समांतर आरक्षण असल्यास त्या संबंधी कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित छायाप्रती मागविण्याकरीता खालीलप्रमाणे कालबध्द कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कागदपत्र पडताळणीकरीता खालील नमूद वेळापत्रकाप्रमाणे उमेदवार यांनी प्रथमतः **कक्ष क्र--- १ ला मजला, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्र (पू) येथे हजर रहावे. व तद्नंतर सर्व कागदपत्रांसह गुलझारीलाल नंदा सभागृह, , ३ रा मजला, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्र (पूर्व), ४०००५१ येथे हजर रहावे**

### कालबध्द कार्यक्रमाची रूपरेषा

| दिनांक | वेळ | संवर्ग | उमेदवारांची संख्या |
|---|---|---|---|
| ०६.०६.२०२२ | सकाळी १०.००वा | कार्यकारी अभियंता | अ.क्र.१ ते १० |
| | | उप अभियंता | अ.क्र.१ ते १४ |
| | | सहायक अभियंता | अ.क्र.१ ते २४ |
| | | कनिष्ठ अभियंता | अ.क्र.१ ते ७५ |
| | दुपारी २.००वा | कार्यकारी अभियंता | अ.क्र.११ ते २० |
| | | उप अभियंता | अ.क्र.१५ ते २७ |
| | | सहायक अभियंता | अ.क्र.२५ ते ४८ |
| | | कनिष्ठ अभियंता | अ.क्र.७६ ते १५० |
| ०७.०६.२०२२ | सकाळी १०.००वा | कार्यकारी अभियंता | अ.क्र.२१ ते ३० |
| | | उप अभियंता | अ.क्र.२८ते ४१ |
| | | सहायक अभियंता | अ.क्र.४९ ते ७२ |
| | | कनिष्ठ अभियंता | अ.क्र.१५१ ते २२५ |
| | दुपारी २.००वा | कार्यकारी अभियंता | अ.क्र.३१ते ४० |
| | | उप अभियंता | अ.क्र.४२ ते ५४ |
| | | सहायक अभियंता | अ.क्र.७३ ते ९५ |
| | | कनिष्ठ अभियंता | अ.क्र.२२६ ते २९७ |

उपरोक्त सूची पैकी कार्यकारी अभियंता या संवर्गाच्या सूची मध्ये नव्याने समाविष्ठ केलेले उमेदवार श्री.आशिष मुंदडा व श्री.बाळासाहेब मुंडे यांनी दि.०६.०६.२०२२ रोजी सकाळी १०.०० वा व श्रीमती वृषाली विजय महात्मे यांनी दि.०७.०६.२०२२ रोजी स.१०.०० वा. कागदपत्र पडताळणीकरीता उक्त नमूद ठिकाणी हजर रहावे.

**टिप:** उपरोक्त संवर्गातील सूचीमध्ये एकापेक्षा जास्त संवर्गाच्या सूचीमध्ये नाव समाविष्ठ असणा-या उमेदवारांनी एकाचवेळी कागदपत्रे पडताळणी करीता सादर करावीत.

उर्वरित संवर्गातील कागदपत्र पडताळणी सूचीमध्ये समाविष्ठ उमेदवारांना टप्याटप्याने कागदपत्र पडताळणीकरीता बोलविण्यात येईल. उमेदवारांनी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर वारंवार भेट द्यावी.

सचिव

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण